# प्रकरण- 2

मुंबई शहरातील नागरिकांना वैद्यकिय सुविधा देण्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेचे एक कार्य आहे. मुंबई उपनगरांतील विविध विभागातील नागरिकांना वैद्यकिय सेवा देण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेची 16 सर्वसाधारण रूग्णलये मुंबईतील विविध उपनगरीय विभागांत आहेत.

मुलुंड (पूर्व) विभागातील असलेले स्वातंत्र्यवीर सावरकर हॉस्पिटल, हे महानगरपालिकेचे सर्वसाधारण रूग्णालय पूर्व उपनगरांतील शेवटच्या टोकापर्यंत रूग्णांना सेवा पुरविते. हॉस्पिटलची संकल्पना साधारण 1974 मध्ये अंमलात आली. स्वातंत्र्यवीर सावरकर हॉस्पिटल सोईनुसार मुलूंड रेल्वे स्टेशन व पूर्व द्रुतग्रती महामार्गाचा मध्य साधून टी. सी. नं. 506 आणि भाग 507 मुलूंड (पूर्व) या ठिकाणी सन 1977 मध्ये स्थापना करण्यात आले. या हॉस्पिटलमध्ये ठाणे आणि त्या पलिकडील विभागातून रूग्ण येतात. संस्थेने पूर्व उपनगरापर्यंतच्या नागरिकांना सर्व माध्यमिक स्तरांवरील आरोग्य सेवा उपलब्ध करून दिल्या.

रूग्णालयाची फक्त एक इमारत असून तिला जोडून कर्मचा-यांची निवासस्थाने आणि निवासी वैद्यकिय अधिकारी (आरएमओ) यांचे निवासस्थान आहे.

इमारत आधुनिक रचनेप्रमाणे तळमजला अधिक पाच मजले असून सहाव्या मजल्यावर ऑफिस (कार्यालय) आणि प्रमुख वैद्यकिय अधिकारी यांचे कार्यालय आहे.

हॉस्पिटलच्या अधिक विस्तृतिसाठी पुढे वाव नाही.

हॉस्पिटल रेल्वे स्टेशनपासून जवळ असल्याने जनतेच्या सोईचे झाले आहे.

सध्या ट्रामा केअर युनिट" बाबतची संकल्पना हॉस्पिटलकडे आहे. कार्य प्रगतिपथावर आहे.

हॉस्पिटलमध्ये रूग्णांना, खालील विभागातील रूग्णांना जेवणाची व्यवस्था करण्यात आलेली आहे जसे जनरल वैद्यकिय, जनरल सर्जरी, स्त्री रोग विषयक बालरूग्ण, मनोरूग्ण विभाग, कान, नाक,घसा, नेत्ररोग, आयुर्वेदीक/ होमियोपेथीक /व्हीसीटीसी / पीएमटीसीटी/पॅथॅलोजी डीपार्टमेंटसह

## हॉस्पिटलमध्ये विविध बाह्यरूग्ण विभाग आहेत. त्यांचे वार व वेळ खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | वैद्यकिय | दररोज | सकाळी 8.30 ते 11.30 |
| 2. | बालरोगतज्ञ | दररोज | सकाळी 8.30 ते 11.30 |
| 3. | स्त्री – रोग | गुरूवार, शनिवार | सकाळी 8.30 ते 11.30 |
| 4. | मॅटर्निटी | मंगळवार, गुरूवार | दुपारी 1.00 ते 3.00 |
| 5. | सर्जरी | सोमवार, बुधवार, शुक्रवार | सकाळी 8.30 ते 11.30 |
| 6. | कान  नाक घसा | गुरूवार, शुक्रवार,शनिवार | दुपारी 1 ते 3 |

| | | | |
|---|---|---|---|
| 7. | नेत्र-रोग | सोमवार, बुधवार, शुक्रवार | दुपारी 1 ते 3 |
| 8. | एक्स-रे विभाग | दररोज | सकाळी 8 ते सायंकाळी 4 |
| 9. | इसिजी विभाग | दररोज | 8 ते 4 |
| 10. | ओटीपीटी डीपार्टमेंट | दररोज | 8 ते 12 |
| 11. | पॅथालॉजी | दररोज | 8 ते 4 |
| 12. | व्हीसीटीसी | दररोज | 8 ते 4 |
| 13. | फिजीयोथेरापी | दररोज | 8 ते 12 |
| 14. | दंत विभाग | दररोज | 8 ते 10.30 |

सर्जरी आणि स्त्री –रोग शस्त्रक्रियेसाठी शस्त्रक्रियागृह आहे. डोळयासाठी वेगळे शस्त्रक्रिया गृह आहे. या हॉस्पिटलमध्ये अपघात विभाग नाही.

तथापि तात्काळ बाह्यरूग्ण विभागातून 24 तास हे रूग्णालयाल रूग्णांना सेवा देते. त्याचप्रमाणे तेथे रोगनिदान चाचणी म्हणजेच पॅथॉलॉजी आणि एक्स रे विभाग 24 तास उपलब्ध नाही.

हा विभाग फक्त एकाच पाळीत कार्यरत असतो आणि म्हणून आकस्मिक रूग्णांना दुस-या आणि रात्र पाळीत सेवा पुरविणे कठीण होऊन जाते.

या सुविधा 24 तास चालू करण्याचा प्रस्ताव, ट्रामा युनिट चालू करण्याचे अगोदर, विचारधिन आहे.

या सर्व सुविधा चालू करण्याचे आणि नियोजन करणे, संस्थेच्या रचनेप्रमाणे, पुढील पानावर दर्शविण्यात आले आहे.

यशस्वीरित्या परिणामकारक सेवा पुरविण्यासाठी जनतेच्या पूर्ण सहकार्याची अपेक्षा आहे.

या रुग्णालयात दक्षता समिती सभासद आहेत, त्यांच्याबरोबर मिटींग घेऊन, तक्रारींबाबत, इतर सूचना तसेच पुढिल कार्यवाहीबाबत चर्चा व सुचना केल्या जातात.

रुग्णालयात तात्काळ तक्रार पेटी हॉस्पिटलच्या तळमजल्यावर योग्य ठिकाणी ठेवण्यात आलेली आहे.

सुविधांची पाहणी आणि नियोजन करण्यासाठी प्रमुख वैद्यकिय अधिकारी /वरिष्ठ वैद्यकिय अधिकारी भेटून हे नियमितपणे फेरफटका मारीत असतात. ते विभागातून नियमितपणे सोईस्कर सुविधा उपलब्ध होण्यासाठी रिपोर्ट /अहवाल घेत असतात. जसे वैद्यकिय कार्यालय रिपोर्ट बुक, प्रवेश रजिस्टर्स, एमएलसी केसेस, मृत्यूनोंद, प्रस्तुति, ओ.टी. लिस्ट इत्यादी.